# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१२२८
२५६२१२२९
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे–४११००७.

**संदर्भ** : साफुपुवि/निववि/३८५ **दिनांक** : १९/१०/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत **'अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती कार्यशाळा अर्थसहाय्य योजना'** (**योजना क्र. ०७२६२७**) या उपक्रमाअतंर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत **'अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती कार्यशाळा अर्थसहाय्य योजना'** (**योजना क्र. ०७२६२७**) या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत असून सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **सोमवार, दिनांक १९/१०/२०२६ ते सोमवार, दिनांक २६/१०/२०२६** असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे –

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

आपणास विनंती की, सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्याची आवश्यकता नाही. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही.

कळावे,

आपला विश्वासू,
१९/१०/२६
सतिश पो. गडदरे
सहायक कुलसचिव

सोबत : योजना व नियमावली (पान १ ते ५).

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम २०२६—२७

## योजना क्रमांक : ०७२६२७

**योजनेचे नाव : अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती कार्यशाळा अर्थसहाय्य योजना**

**प्रस्तावना**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये **'अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती कार्यशाळा'** या विषयावर अर्ध दिवसीय कार्यशाळेचे महाविद्यालयांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचेसाठी आयोजन करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याचे निश्चित करण्यात आले असून या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रक्कम रूपये ३०,०००/— इतके अर्थसहाय्य देण्याचे निश्चित केले आहे. तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत अशाच महाविद्यालये/परिसंस्थांना या योजनेसाठी प्रस्ताव सादर करता येतील.

अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र शासन, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स ,केंद्र शासन तसेच या विषयावर कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था यांना सोबत घेऊन सदर उपक्रमाची आखणी करण्यात यावी. अंमली पदार्थविरोधी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांमधील सामाजिक कार्यकर्ते तसेच तसेच पोलीस प्रशासनामध्ये अंमलपदार्थ विरोधी युनिटमध्ये कार्यरत अधिकाऱ्यांना संसाधन व्यक्ती म्हणून बोलविण्यात यावे.

**अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती कार्यशाळेची रूपरेषा :**

१) सदर कार्यशाळेची सुरूवात विद्यापीठ गीताने करण्यात यावी.

विद्यापीठ गीत खालील लिंकवर उपलब्ध आहे.

**www.unipune.ac.in—Home page—Planning and Development—Circular For Colleges**

२) कार्यशाळेचे उद्घाटन — १०—१५ मिनिटे

३) ४५ मिनिटांचे प्रत्येकी दोन सत्रे

४) कार्यशाळा समारोप — १०—१५ मिनिटे

५) किमान विद्यार्थ्यांची उपस्थिती : १०० विद्यार्थी

६) या योजनेसाठी विद्यापीठाकडून मिळणारे जास्तीत जास्त अर्थसहाय्य रक्कम रू. ३०,०००/— (तीस हजार रूपये) इतके मंजुर करण्यात येईल.

८) ज्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत अशा महाविद्यालयांना या योजनेसाठी प्रस्ताव सादर करता येतील.

९) कोणताही सत्कार/स्वागत करण्यासाठी मोमेंटो/पुष्पगुच्छ देण्यात येऊ नये. (आवश्यकता भासल्यास पुस्तक/वृक्षाचे रोप देऊन स्वागत करण्यात यावे.)

१०) सदर कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून अंमली पदार्थविरोधी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांमधील सामाजिक कार्यकर्ते तसेच पोलीस प्रशासनामध्ये अंमलीपदार्थ विरोधी युनिटमध्ये कार्यरत अधिकाऱ्यांना बोलविण्यात यावे.

PLANNING AND DEVELOPMENT

११) सदर कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधन व्यक्तीस प्रति व्याख्यानाचे प्रत्येकी एक व्याख्यान रक्कम रू. २,०००/— इतके मानधन देण्यात यावे. (जास्तीत जास्त दोन व्याख्याने)

१२) व्यासपीठावरील बॅनरवर **'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत'** असा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१३) कार्यशाळेचे आयोजन केलेले ६X४ आकाराचे सुस्पष्ट फोटो (फोटोवर दिनांक व वेळ दिसेल असे) जोडावेत. सदर फोटो पैकी एक फोटो स्टेजवरील मान्यवर व बॅनरसह असावा व एक समोरील सहभागी व्यक्तींचा असावा.

१४) सदर कार्यशाळेचे आयोजन मंजुरी दिनांकापासून ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे.

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

2/4

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम २०२६—२७

## योजना क्रमांक : ०७२६२७

### योजनेचे नाव : अंमलीपदार्थ विरोधी जनजागृती कार्यशाळा अर्थसहाय्य योजना नियमावली

१) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांकडे विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेसाठी कार्यशाळेचे/परिसंवादाचे आयोजन करण्यास पात्र राहतील. सदर मान्यतेची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

२) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडून परीक्षा अथवा अन्यकामी उचल रक्कम घेतली असेल व त्याचे हिशेब विहित वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे. हिशेब/उचल रक्कम प्रलंबित नसल्याबाबतचे प्राचार्यांनी दिलेले प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे शुल्क अदा केले आहे अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

४) नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना—हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा शुल्क भरलेल्या चलनाची छायांकित प्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) ज्या महाविद्यालय/परिसंस्था यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे शुल्क अदा केले आहे अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल. सदर चलनाची छायांकीत प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

६) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नाही किंवा सुरु नाही. अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

७) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले आहे. अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

८) सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे.

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

९) विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नीत झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय/परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

१०) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

११) गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

१२) ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थाना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थानी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

१३) सदर कार्यशाळा आयोजित केल्यानंतर त्याची देयके विद्यापीठास सादर करताना त्यासोबत व्यासपीठ व त्यावरील बॅनर तसेच सभागृहात उपस्थित सहभागी व्यक्ती यांचे स्पष्ट (Geo tagged) छायाचित्र (फोटोग्राफ) जोडणे आवश्यक आहे.

१४) व्यासपीठावरील बॅनरवर **'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत'** असा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१५) गुणवत्ता सुधार योजनेसाठीचे अनुदानाबाबतचे निर्णय हे संबधित अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून घेतले जातील.

१६) कार्यशाळा आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा.

अ) साधन व्यक्तीचा मानधन व प्रवास खर्च – ३०%

ब) शैक्षणिक साहित्य व किरकोळ खर्च – ३०%

क) आतिथ्य खर्च – ४०%

१७) विद्यापीठाने अर्थसहाय्य मंजूरीची यादी जाहीर केलेल्या दिनांकानंतर महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

१८) कोणताही प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

१९) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहीत मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, मार्गदर्शक तत्वांनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
PLANNING AND DEVELOPMENT
PUNE-7